# तलत मेहमूद - भाग १



२४ फेब्रुवारी १९२४ रोजी लखनौ येथे तलत मेहमूद यांचा जन्म झाला. त्यांचे वडील मन्सूर मेहमूद ह्यांचे त्या शहरात इलेक्ट्रिकल वस्तूंचे दुकान होते. त्यांचे जुन्या वळणाचे पारंपारिक मुस्लिम कुटुंब असल्यामुळे घरातील कोणी संगीत विषयाला वाहून घेईल किंवा गाणे-बजावणे हे उपजीविकेचे साधन करेल हे अशक्यप्रायच होते. परंतु तलतला गाण्याचे वेड होते. तलतची आत्या म्हणजे त्यांच्या वडिलांची बहीण त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली. त्याला गाता गळा आहे आणि त्यात शिक्षण घेऊन त्याला त्याची स्वप्ने पुरी करायची आहेत हे लक्षात आल्यावर त्याच्या आत्याने आपल्या भावाचे मन वळवले आणि तलतला त्याचे सुख स्वत: शोधू देत असे त्याच्या वडिलांना आग्रहाने सांगितले.

अलिगढ येथे तलतचे बालपण आणि मिंटो सर्कल स्कूल मध्ये प्राथमिक शिक्षण झाले, तर इस्लामिया कॉलेजमधून हायस्कूल (माध्यमिक शिक्षण) पार पडले. आता तो किशोरवयाचा झाला आणि त्याच सुमारास के. एल्. सैगल हे अतिशय लोकप्रिय गायक म्हणून प्रसिध्दीस आले होते. एखादा माणूस इतके सुंदर गाऊच कसे शकतो ह्याचे तलतला फार अप्रूप वाटे. सैगलचे गाणे तो धुंद होऊन ऐकत असे, हे पाहून घरच्यांनी त्याला ग्रामोफोन आणून दिला. हॅन्डल फिरवणे, धावत्या रेकॉर्डवर सुई हळूवार ठेवणे ह्यात त्याचे तासन् तास जात. लवकरच रेकॉर्डच्या सोबत तोही गाऊ लागला.

एके दिवशी शाळेत त्याला अचानकच स्टेजवर गाण्यास सांगण्यात आले. तो स्टेजवर गेला आणि

त्याने सैगलचे ‘नुक्तचीन है गम-ए-दिल’ गायला सुरुवात केली. पण मध्येच तो गाण्याचे शब्द विसरला आणि अडखळला. मुलांनी त्याची चेष्टा केली. तलतला रडू आवरेना आणि त्याला खूप वाईट वाटले. परंतु खरेतर ही इष्टापत्तीच झाली. खट्टू न होता तलतने ह्या अनुभवातून धडा घेण्याचे ठरविले.

मनात थोडी धास्ती असली तर त्यामुळे वक्तृत्वकला सुधारण्यास मदतच होते. (ह्या विषयावर) डेल कार्नेगीने आपल्या पुस्तकातील एका प्रकरणात हे छान विषद केले आहे. तसं पाहिलं तर हा मुलगा मुळात थोडा भित्रटच होता.

शाळेत असताना तलतचा पुस्तकी ज्ञानाकडे अजिबात कलच नव्हता, तर संगीताकडे तो पूर्णपणे ओढला गेला होता. त्यामुळे शालेय शिक्षण पूर्ण केल्यावर संगीत शिकण्यासाठी तलत लखनौच्या मॅरिस कॉलेजमध्ये परत आला. पुढे ह्या कॉलेजचे नाव भातखंडे संगीत विद्यापीठ असे बदलण्यात आले. शास्त्रीय संगीताचे उपासक भातखंडेबुवा तेथे संगीत शिकवत असत. ह्या कॉलेजची निवड समिती उमेदवाराचे गाणे ऐकूनच त्याला तेथे प्रवेश देत असत. तलतने सादर केलेला फक्त आलापच ऐकून त्याची निवड झाली. तो होताच तसा तयारीचा ! ह्या मुलाकडे गायनाची असामान्य अशी दैवी देणगी आहे हे निवड समितीने लगेचच जाणले आणि बाकी काही परीक्षा वगैरे न होता त्याला सहजपणे प्रवेश मिळाला. (त्याचा आलाप काय तयारीचा असे हे पहायचं असेल तर ‘शिकस्त’ मधील ‘सपनोंकी सुहानी दुनिया मे’ ह्या गाण्याची आलापाने केलेली सुरुवात ऐकावीच.)

मॅरिस कॉलेजमध्ये तो संगीत शिकत असतानाच त्याच्या अंगी उपजतच असलेल्या प्रचंड गुणांची कीर्ती सगळीकडे पसरली. आणि अर्थातच रेडिओ लाहोर आणि रेडिओ लखनौ ह्या दोन्ही केंद्रांमधून त्याला मानाचे बोलावणे आले. आपणही मागे नाही असे दाखवत HMV ने पण प्रत्येक ध्वनीमुद्रणाला रु. ३० या दराने त्याच्याशी एक वर्षासाठी करार केला. परिणामी तलतने शिक्षण अर्धवट सोडून ‘सब दिन एक समान नही ओ’ हे गाणे रेकॉर्ड करण्यासाठी कलकत्त्याची वाट धरली. फय्याज यांनी लिहिलेले आणि कमल दासगुप्ता यांनी सुरेल चाल दिलेले हे गाणे तलतने सप्टेंबर १९४१ मध्ये रेकॉर्ड (ध्वनिमुद्रित) केले तेव्हा त्याने नुकतेच सतरावे संपून अठराव्या वर्षात पदार्पण केले होते. ह्या दरम्यान त्याने 'एचएमव्ही'साठी ५ गीते आणि गझले गायली. हे सर्व संपल्यावर आपला उरलेला संगीताचा अभ्यासक्रम पूरा करण्यासाठी मॅरिस कॉलेजमध्ये तो परत मागे आला.

ह्या कॉलेजामधून संगीतातील पदवी तलतने घेतली खरी पण म्हटलं तर ती एकांगी अशी होती. त्याला पुस्तकी अभ्यासात काही गतीच नव्हती. तो उत्तरपत्रिका जवळजवळ कोरीच देऊन बाहेर पडत असे, परंतु प्रत्यक्ष गायनात मात्र तो अव्वल ठरत असे. कायम उच्च स्थान पटकावीत असे !

पदवी हातात आल्यावर त्याच्या अंगी स्वाभाविकपणे भरपूर आत्मविश्वास आला. पुन्हा एकदा तो कलकत्त्याला गेला. आता त्याला त्याचा आवडता गायक के. एल. सैगल यांना खास करून भेटायचे होते. 'माय सिस्टर' या चित्रपटातील 'दो नैना मतवारे' या गाण्याच्या रेकॉर्डिंगच्या वेळी त्याची या दिग्गज गायकाशी भेट झाली. तलतने त्यांचे गाणे रेकॉर्ड होताना ऐकले आणि त्याला जणू दैवी साक्षात्कार झाल्याचा भास झाला. त्याच्या अंगी चैतन्य संचारले. त्याची ही अवस्था त्याच्याच भाषेत सांगायची तर तो म्हणाला, "नूर की एक बारीश हो रही थी"

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com